| MHKO140000011981 | नियमित दिवाणी दावा क्र.३४/१९८१ मधील नि.क्र.३५८ वरील आदेश.<br>श्री. अंबाजी बसरगेकर व इतर.<br>वि.<br>श्री. ईश्वर गावडा व इतर. |
|---|---|

वादी यांनी सदर अर्ज वादी क्र.१/४ द्रोपदी रुक्माना मसुरकर याांचे अर्जामध्ये नमुद वारस दाव्याच्या सरनाम्यामध्ये नमुद करुन ते फौलावर घेणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल जोरदार हरकत घेवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०२. वादीच्या कथनानुसार, त्यांनी सदर दावा वाटप, कब्जा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. वादी क्र.१/४ या दि. १२/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादीचे पती ३० वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. अर्जामध्ये नमुद वादी १/४/अ हे वादी यांचे वारस आहेत. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. वादीने सदर दावा हा वाटप, ताबा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. दाव्यातील नि.क्र.३६२ कडील यादी लगत दाखल असणारे वादी क्र.१/४ चे मृत्यू प्रमाणपत्र पाहता त्या दि.१२/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी विहित मुदतीत मयत वादी क्र.१/४ यांचे वारस फौलावर घेतले नाहीत त्यामुळे त्याचे विरुद्ध नियमानुसार दावा अबेट झालेचा आदेश नि.क्र.३५७ वरील आदेशान्वये रद्द करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## आ दे श

०१. वादीचा अर्ज नि.क्र.३५८ मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांनी मयत वादी क्र.१/४ चे अर्जामध्ये नमुद १/४/अ वारस फौलावर घेऊन दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत विना विलंब सादर करावी.

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.05.02 17:31:31 +0630

**ठिकाण–चंदगड**
**दिनांक – ०२.०५.२०२३**

**(चारुदत्त उद्धव शिपकुले)**
**सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,चंदगड.**